# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.01.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर
2. अंमली पदार्थांविरुद्ध देशव्यापी सामूहिक मोहिमेला येत्या 31 मार्चपासून सुरुवात, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा
3. नवी दिल्लीत आजपासून 53 व्या जागतिक पुस्तक मेळ्याला सुरुवात
4. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 28 जानेवारीपासून सुरू होणार
5. हिमाचल प्रदेशात बस दरीत कोसळून 14 जण ठार आणि
6. सिक्कीममध्ये आइस हॉकी सुरू करण्याची योजना

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान राजकोट, अहमदाबाद आणि गांधीनगरमधल्या विविध विकास योजनांच्या कार्यक्रमात आणि राजनैतिक कार्यक्रमांमध्ये तसंच सोमनाथ स्वाभिमान पर्वासह अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहतील. सोमनाथ मंदिराच्या चिरस्थायी भावनेचा उत्सव साजरा करणारा चार दिवसांचा सोमनाथ स्वाभिमान पर्व उत्सव गुरुवारी गिर सोमनाथ जिल्ह्यातील वेरावळ शहरात सुरू झाला. 1026 मध्ये गझनीच्या महमूदनं सोमनाथ मंदिरावर केलेल्या पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्षी हा उत्सव 1951 मध्ये पुनर्संचयित मंदिराच्या उद्घाटनाच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त देखील होत आहे. पंतप्रधान आज संध्याकाळी सोमनाथ मंदिरात ओंकार मंत्र जपात सहभागी झाल्यानंतर मंदिरात ड्रोन शो ला देखील उपस्थित राहतील. सोमनाथ मंदिराचे रक्षण करण्यासाठी शतकानुशतके आपले प्राण अर्पण करणाऱ्या असंख्य योद्ध्यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात येणाऱ्या उद्याच्या औपचारिक शौर्य यात्रा मिरवणूकीत देखील पंतप्रधान सहभाग नोंदवतील. पंतप्रधान उद्या, दुपारी राजकोटला जातील आणि मारवाडी विद्यापीठात कच्छ आणि सौराष्ट्र प्रदेशासाठी व्हायब्रंट गुजरात प्रादेशिक परिषदेचं औपचारिक उद्घाटन करतील. याप्रसंगी ते उपस्थितांना संबोधितही करतील तसंच व्यापार प्रदर्शनाचं उद्घाटन करतील.

**उपराष्ट्रपती**

2047 पर्यंत विकसित भारत बनण्याच्या प्रवासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत आज खंबीरपणे उभा असल्याचं उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पंजाबमधील जालंधरजवळील फगवाडा इथल्या लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. देशानं विकसित, स्वावलंबी आणि आत्मविश्वासपूर्ण भारत निर्माण करण्याचं महत्त्वाकांक्षी परंतु साध्य करण्याजोगं ध्येय ठेवलं असल्याचं सांगून ते म्हणाले की, भारत जागतिक महासत्ता बनण्यासाठी काम करत आहे.

**गृहमंत्री**

येत्या 31 मार्चपासून अंमली पदार्थांविरुद्ध देशव्यापी सामूहिक अभियान मोहिमेला सुरुवात करण्यात येईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली आहे. ते काल नवी दिल्लीत नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर म्हणजेच एनकॉर्डच्या बैठकीत बोलत होते. तीन वर्षे चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश देशाला अंमली पदार्थमुक्त करणे हा आहे. अंमली पदार्थांविरुद्धच्या या लढ्यात केंद्र सरकारच्या सर्व विभागांनी 2029 पर्यंतचा कृती आराखडा तयार करावा आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी एक कालबद्ध यंत्रणा स्थापन करावी, असे निर्देश गृहमंत्र्यांनी यावेळी दिले. अंमली पदार्थांचं उत्पादन करणाऱ्या किंवा त्यांची विक्री

करणाऱ्यांबद्दल कोणतीही सहानुभूती न बाळगण्याची सरकारची स्पष्ट भूमिका स्पष्ट आहे, असंही ते म्हणाले. तसंच अंमली पदार्थांविरुद्धच्या लढ्यात न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवरही त्यांनी प्रकाश टाकला आणि सर्व पोलीस महासंचालकांना राज्य-स्तरीय कृती आराखडे तयार करून जप्त केलेल्या अंमली पदार्थांच्या वेळेवर विल्हेवाटीसाठी ठोस पावलं उचलण्याचं आवाहन गृहमंत्री शाह यांनी केलं.

**<u>पुस्तक मेळा</u>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आजपासून 53 व्या जागतिक पुस्तक मेळ्याला सुरुवात होत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान या मेळ्याचं उद्घाटन करणार आहेत. भारतासह जगभरातील प्रकाशक, लेखक, वाचक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणण्यासाठी हा पुस्तक मेळा एक महत्वाचं व्यासपीठ आहे. नऊ दिवसांच्या या पुस्तक मेळ्यात 35 हून अधिक देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एक हजाराहून अधिक प्रकाशकांचा सहभाग असेल. यंदा या पुस्तक मेळ्यासाठी 'भारतीय लष्करी इतिहास: शौर्य आणि ज्ञान' अशी मध्यवर्ती कल्पना ठरवण्यात आली असून लष्करी इतिहासावरील पाचशेहून अधिक पुस्तकं प्रदर्शित केली आहेत तसंच शंभरहून अधिक संकल्पना-आधारित कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. इंग्रजी, हिंदी आणि इतर भारतीय भाषांमधील विविध प्रकारची पुस्तके प्रदर्शनात आहेत, ज्यात कला आणि संस्कृती, इतिहास, चित्रपट, चरित्रे, बालसाहित्य आणि राष्ट्रीय वारसा यांसारख्या विषयांचा समावेश आहे. या मेळ्यात 'ऑथर्स कनेक्ट', 'युवा कॉर्नर', 'बाल लेखक कॉर्नर' सारख्या विशेष कार्यक्रमांचाही समावेश आहे.

**<u>अर्थसंकल्पीय अधिवेशन</u>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 28 जानेवारीपासून सुरू होणार असून ते 2 एप्रिलपर्यंत चालेल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काल ही माहिती दिली. या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा 13 फेब्रुवारीला संपेल आणि संसद दुसऱ्या टप्प्यासाठी 9 मार्चला पुन्हा सुरू होईल, असंही  रिजिजू म्हणाले.

**<u>हिमाचल-अपघात</u>**

हिमाचल प्रदेशात सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधारजवळ काल एक खाजगी बस खोल दरीत कोसळल्यानं 14 जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण गंभीर जखमी झाले. 66 प्रवाशांना घेऊन जाणारी ही बस सोलनहून हरिपूरधारला जात असताना हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक रहिवासी आणि जिल्हा प्रशासनानं तात्काळ बचाव आणि मदत कार्य सुरू केलं. उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री यांनी अपघातस्थळी भेट दिली. अपघाताचं नेमकं कारण शोधण्यासाठी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे.

**<u>ईडी</u>**

सक्तवसुली संचालनालय म्हणजेच ईडीनं पश्चिम बंगालमध्ये केलेल्या छापासत्राच्या पार्श्वभूमीवर कलकत्ता उच्च न्यायालयातून दिलासा न मिळाल्यानं, ईडीनं सर्वोच्च न्यायालयात जाण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. शनिवार आणि रविवार सुट्टीचे दिवस असल्यानं, ईडीनं त्यांचा अर्ज ऑनलाइन दाखल करण्याची तयारी केली असून ईडीनं तातडीच्या सुनावणीची विनंती केली आहे.तर दुसरीकडे, राज्य सरकारनंही सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचं वृत्त आहे.

**<u>व्यापारी-बैठक</u>**

राष्ट्रीय व्यापारी कल्याण मंडळाची आठवी बैठक काल नवी दिल्लीत मंडळाचे अध्यक्ष सुनील जे. सिंघी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या व्यापारी कल्याण मंडळानं स्वदेशी उद्योगांना चालना देण्यासाठी आणि स्थानिक पातळीवरच्या उत्पादित वस्तूंना प्रोत्साहन देण्यासाठी 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमाच्या महत्त्वावर भर दिला असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे. या बैठकीत बोलताना उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सहसचिव संजीव यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापार क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला.

**रेल्वेमंत्री**

भारतीय रेल्वे जागतिक स्तरावर आदर्श निर्माण करण्यास आणि 2027 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सुसज्ज आहे,असं  मत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत रेल्वे सेवा पुरस्कार सोहळ्यात बोलत होते. यावेळी 100 रेल्वे अधिकाऱ्यांना 70 वा 'अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार 2025' प्रदान करण्यात आला. अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार हा भारतीय रेल्वेमधील सर्वोच्च सन्मानांपैकी एक असून  हा पुरस्कार समर्पण, नावीन्य आणि सेवेतील उत्कृष्टतेचा गौरव करण्यासाठी दिला जातो.

**DRDO**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना डीआरडीओनं स्वनातीत क्षेपणास्त्र कार्यक्रमासाठी दीर्घ कालावधीच्या स्क्रॅमजेट इंजिनची जमिनीवरील यशस्वी चाचणी घेतली आहे. 12 मिनिटांपेक्षा जास्त कालावधीसाठी ही चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचं संरक्षण मंत्रालयानं काल एका निवेदनात म्हटलं आहे. स्वनातीत क्रूझ क्षेपणास्त्र दीर्घ कालावधीसाठी ताशी 6 हजार 100 किलोमीटरपेक्षा जास्त म्हणजे ध्वनीच्या वेगाच्या पाचपटीहून अधिक वेग गाठण्यास सक्षम आहे.

**विश्व हिन्दी दिन**

विश्व हिंदी दिन आज साजरा केला जात आहे. जगभरात हिंदीच्या प्रचारासाठी जागरूकता निर्माण करणे आणि हिंदीला आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून सादर करण्याच्या उद्देशानं या दिवसाचं महत्व आहे. पहिली जागतिक हिंदी परिषद 10 जानेवारी 1975 ला नागपूर इथं आयोजित करण्यात आली होती.भारत सरकारने 2006 मध्ये 10 जानेवारी हा दिवस दरवर्षी जागतिक हिंदी दिन म्हणून साजरा करण्याचं जाहीर केलं. संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हिन्दी भाषेची ओळख आणि वापर वाढवण्यासाठी सरकार सातत्यानं प्रयत्नशील असून हिंदी ही युनेस्कोच्या नऊ कार्यरत भाषांपैकी एक आहे.

**सिक्कीम**

सिक्कीममध्ये हिवाळी खेळ म्हणून आइस हॉकी सुरू करण्याची योजना आखण्यात आहे. पूर्व सिक्कीममधील ग्नाथंग व्हॅलीमध्ये नैसर्गिक आइस रिंक उभारण्याची तयारी सुरू आहे. ही सुविधा पुढील हिवाळ्यापर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. गंगटोकचे जिल्हाधिकारी तुषार निखारे, सिक्कीम माउंटनियरिंग असोसिएशनचे अध्यक्ष कुन्झांग ग्यात्सो भुतिया यांनी सिक्कीम सरकारचा क्रीडा विभाग आणि आइस हॉकी असोसिएशन ऑफ इंडियाच्या समन्वयानं आइस हॉकी सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सिक्कीममधील हिवाळ्याच्या परिस्थितीत इतर हिमालयीन राज्यांच्या तुलनेत जास्त वेळ खेळता येतं, तसंच सिक्कीमचा भूप्रदेश आणि हवामान लडाखमधील सुरुवातीच्या टप्प्यातील आइस हॉकीच्या वातावरणाशी मिळतंजुळतं आहे. या उपक्रमामुळे तरुणांना राष्ट्रीय स्तरावरील हिवाळी खेळांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल, असं लडाखचे राष्ट्रीय खेळाडू आणि प्रशिक्षक गुलाम मुस्तफा यांनी सांगितलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.